Session : 8

Date : 20/09/25

News: lokudhar

साप्ताहिक

लोकउध्दार

# किणी येथे सायबर सुरक्षिततेवर मार्गदर्शन



अक्कलकोट (प्रतिनिधी) : अक्कलकोट तालुक्यातील किणी येथील श्री. मल्लिकार्जुन प्रशालेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या संगणक शास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना सायबर शिक्षण व सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

संगणक शास्त्र विभागातील सुष्मिता राठोड व श्रुती गणपा या विद्यार्थिनींनी सायबर शिक्षण आणि सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. इंटरनेटवरून होणाऱ्या विविध प्रकारच्या फसवणुकीबद्दल उदाहरणांसह माहिती दिली.

फसवणूक होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांनी सावधगिरी बाळगणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. मोबाईलवर आलेली ओटीपी कोणालाही सांगू नये, अनोळखी नंबरवरून आलेल्या फोन कॉलवर विश्वास ठेवू नये, व्हॉट्सअॅप व इतर सोशल मीडियावरील मेसेजेस 'क्लिक' करण्याआधी विचार करावा, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, पासवर्ड स्ट्राँग ठेवावा व आपली माहिती सुरक्षित ठेवावी अशी महत्वपूर्ण माहिती सांगण्यात आली.

लॅपटॉप, इंटरनेटसह इतर उपकरणांचा योग्य वापर केल्यास आयुष्य सुकर होईल. मात्र चुकीच्या वापरामुळे नुकसान होऊ शकते, हे लक्षात ठेवण्याची विद्यार्थ्यांना सूचना करण्यात आली.

कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप बिराजदार, पर्यवेक्षक फरीद जमादार, ,सर्वशिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सहशिक्षक सचिन घोडके यांनी आभार मानले.